RNI No. MAHBIL /2009/31732

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## भाग चार-अ

वर्ष १, अंक ११]     गुरुवार ते बुधवार, एप्रिल २३-२९, २०१५/वैशाख ३-९, शके १९३७     [पृष्ठे २
[किंमत : रुपये ९.००]

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### सार्वजनिक आरोग्य विभाग

जी. टी. रुग्णालय आवार, १०वा मजला, नवीन मंत्रालय, मुंबई ४०० ००१, दिनांक २ मार्च २०१५

### अधिसूचना

**जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९.**

क्रमांक जमृनों. २०१४/प्र.क्र. २२१/कु.क.—ज्याअर्थी, मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने CRI.P.I.L. No. ४/२०१३ च्या दिनांक १७ डिसेंबर २०१३ रोजी दिलेल्या निर्णयामध्ये कार्यकारी दंडाधिकारी यांना जन्म आणि मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ (१९६९ चा १८) मधील कलम १३, पोट-कलम (३) अन्वये उशिरा जन्म-मृत्यू नोंदणीचे अधिकार नाहीत, असे निर्देश दिलेले आहेत ;

आणि ज्याअर्थी, उशिरा नोंदणीबाबतचे अधिकार प्रणालीमध्ये संबंधित क्षेत्रातील प्रथम वर्ग न्यायिक दंडाधिकारी किंवा महानगर दंडाधिकारी यांना आहेत ;

आणि ज्याअर्थी, " महाराष्ट्र जन्म आणि मृत्यू नोंदणी नियम, २००० " (प्रमुख नियम) मधील नियम (९) उप-नियम (३) मधील प्रणालीमध्ये सुधारणा करण्याच्या उद्देशाने.

यासाठी जन्म आणि मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ (१९६९ चा १८) मधील कलम ३० अन्वये प्रदान करण्यात आलेल्या आणि त्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या इतर अधिकारांचा वापर करून आता माहाराष्ट्र शासन, केंद्र शासनाच्या मान्यतेने खालीलप्रमाणे सुधारणा करीत आहे :—

१. या नियमांना " महाराष्ट्र जन्म आणि मृत्यू नोंदणी (सुधारणा) नियम, २०१५ " असे संबोधण्यात येईल.

२. प्रमुख नियमातील नियम (९) चा पोट-नियम (३) खालीलप्रमाणे जागा घेईल :—

" नियम ९ (३) : जर एखादी जन्म अथवा मृत्यूची घटना, घडल्यापासून एक वर्षाच्या आत नोंदणी झाली नसेल, त्याची नोंदणी जन्म किंवा मृत्यू घटनेचा तपशील बरोबर असल्याची खातरजमा करून पाहिल्यानंतर संबंधित प्रथम वर्ग न्यायिक दंडाधिकारी किंवा महानगर दंडाधिकारी यांचेच आदेशाने व विलंब फी रुपये १० भरल्यानंतरच नोंदणी करण्यात येईल. "

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**ज्ञा. ल. सुळ,**
शासनाचे उप सचिव.

## PUBLIC HEALTH DEPARTMENT

G. T. Hospital Complex Building, 10th Floor, Mantralaya,
Mumbai 400 001, dated the 2nd March 2015.

*NOTIFICATION*

Registration of Birth and Death Act, 1969.

No. Jamruno. 2014/C.R. 221/F.W.— Whereas, the Nagpur Bench of the Bombay High Court, *vide* order dated 17th December 2013, passed in Criminal Public Interest Litigation No. 4 of 2013, has held that the Executive Magistrate does not possess the jurisdiction to issue an order under sub-section (*3*) of section 13 of the Registration of Births and Deaths Act, 1969 (18 of 1969), authorising the delayed registration of a birth and death ;

And whereas, it is expeditent to direct that the said power to authorize the delayed registration of a birth or death shall be exercised by the Judicial Magistrate of First Class of the Metropolitan Magistrate of the concerned area ;

And whereas, it is expedient to amend sub-rule (3) of rule 9 of the Maharashtra Registration of Births and Death Rules, 2000 (hererinafter referred to as "the said rules"), for the purpose.

Now, therefore, in exercise of the powers conferred by section 30 of the Registration of Births and Deaths Act, 1969 (18 of 1969) and of all other powers enabling it in that behalf, the central Government amends the said rules, as follows :—

1. These rules may be called the Maharashtra Registration of Births and Death (Amendment) Rules, 2015.

2. In rule 9 of the said rules, for sub-rule (3), the following sub-rule shall be substituted, namely :—

> " (3) Any birth or death which has not been registered within one year of its occurrence shall be registered only on an order of the Judicial Magistrate of First Class or the Metropolitan Magistrate concerned, after verifying the correctness of birth or death, on payment of a late fee of rupees ten. "

By order and in the name of the Governor of Maharashtra,

D. L. SUL,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.